RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ९४

दि.०२ ऑगस्ट २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## बीएमसीला मुंबईची काहीही पडलेली नाही, घनकचरा व्यवस्थापनाच्या भोंगळ कारभारावर हायकोर्टाचे ताशेरे

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिका (बीएमसी) असंवेदनशील असून तिला आता मुंबईबद्दल आपलेपणाची भावनाच राहिलेली नाही. महापालिकेचे अधिकारी वातानुकूलित कार्यालयात बसून असतात, प्रभागात काय चाललंय? याची त्यांना अजिबात पडलेली नसते. या अधिकाऱ्यांना कसलीच परवा नाही, कोणतीही जाणीव नाही, अशा शब्दांत घनकचऱ्याच्या मुद्द्यावरून मुंबई हायकोर्टानं शुक्रवारी (३१ जुलै) मुंबई महापालिका प्रशासनाची चांगलीच खरडपट्टी काढली. कांजूरमार्ग येथील डम्पिंग ग्राऊंडवरील चुकीच्या घनकचरा व्यवस्थापनामुळे होणाऱ्या त्रासाबाबत कन्नमवार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्यावतीनं हायकोर्टात ॲड. अभिजित राणे यांच्यामार्फत याचिका दाखल करण्यात आली आहे.

या याचिकेवर शुक्रवारी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. या सुनावणीत हायकोर्टानं महापालिकेच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला खडेबोल सुनावले. दक्षिण मुंबईतील महत्त्वाच्या पर्यटनस्थळांवर कचऱ्यामुळं निर्माण होणारी घाण आणि दुर्गंधी देशविदेशातील पर्यटकांना सहन करावी लागत असल्याबद्दल हायकोर्टानं प्रशासनाला जाब विचारत आपण खरोखरच सुसंस्कृत समाजात राहतोय का? स्वातंत्र्य आणि लोकशाहीची हीच किंमत आहे का? असे सवालही उपस्थित केले. दक्षिण मुंबईतील राजाबाई टॉवर, मुंबई हायकोर्ट, सत्र न्यायालय आणि फोर्ट परिसरातील हॉर्निमन सर्कलसारख्या वारसा स्थळांच्या जवळ कचऱ्याचे ट्रक आणि कचरा संकलन केंद्रे उभी करताच कशी? असा सवालही यावेळी हायकोर्टानं उपस्थित केला. फोर्ट परिसरातील हॉर्निमन सर्कलजवळ सध्या भला मोठा कचरा डबा ठेवण्यात आल्यानं संपूर्ण परिसरात दुर्गंधी आणि अस्वच्छता पसरतेय. याबाबत संबंधित वॉर्ड अधिकाऱ्यांना अनेकदा तक्रार देऊनही सात दिवस उलचून गेले तरीही कारवाई झाली नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करतानाच, यापुढंही अशी निष्क्रियता कायम राहिल्यास संबंधित अधिकाऱ्यांची गय करणार नाही, असा थेट इशाराच यावेळी हायकोर्टानं दिला.

# 'शासन आपल्या दारी'सोबत आता समाधानही

## विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे प्रतिपादन

## महसूल विभागाच्या शिबिरातून नागरिकांच्या तक्रारींवर समाधानकारक कार्यवाही

**मुंबई/प्रतिनिधी :** महसूल विभागाच्या सेवा आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' हे शासन आणि जनता यांच्यातील परस्पर संबंध अधिक घट्ट करणारा उपक्रम आहे. 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेपुढे जाऊन नागरिकांच्या तक्रारी व अर्जांवर समाधानकारक कार्यवाही करण्याचे काम या शिबिराच्या माध्यमातून होत आहे, असे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केले.

मुंबई शहर जिल्ह्यात दि. २२ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' आयोजित करण्यात आले. या अभियानातील अंतिम शिबिराचे आयोजन १८७-कुलाबा विधानसभा मतदारसंघातील रामा आणि सुंदरी वाटूमल सभागृह, के. सी. महाविद्यालय, चर्चगेट येथे करण्यात आले. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर बोलत होते.



छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतल्यावर रयतेसाठीचा संघर्ष, न्याय आणि हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्य आठवते. त्यांच्या विचारांवर आधारित सक्षम महसूल व्यवस्था निर्माण करण्याचे काम शासन करीत आहे. महसूल विभाग हा शासनाच्या अत्यंत महत्त्वाच्या विभागांपैकी एक असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी त्याचा थेट संबंध आहे. मालमत्ता नोंदणीपासून दुष्काळ, पूर आदी नैसर्गिक आपत्तींच्या वेळी पंचनामे करण्यापर्यंत अनेक महत्त्वाची कामे महसूल विभागामार्फत केली जातात, असे नार्वेकर यांनी सांगितले.

कुलाबा विधानसभा मतदारसंघात आर्थिकदृष्ट्या विविध स्तरातील नागरिक वास्तव्यास आहेत. प्रत्येक नागरिकाला शासनाच्या सेवा सहज आणि पारदर्शकपणे मिळणे आवश्यक आहे. या शिबिरामुळे नागरिकांचा वेळ वाचत असून विविध सेवा एकाच छताखाली उपलब्ध होत आहेत. देश विकसित राष्ट्राच्या दिशेने वाटचाल करीत असताना सक्षम आणि लोकाभिमुख महसूल व्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावेल, असेही त्यांनी नमूद केले.

**एक लाख नागरिकांपर्यंत समाधान शिबिराच्या माध्यमातून पोहोचलो जिल्हाधिकारी आंचल गोयल**

मुंबई शहर जिल्ह्यात २२ जुलैपासून २ ऑगस्टपर्यंत विधानसभा मतदारसंघनिहाय आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिरांच्या माध्यमातून सुमारे एक लाख नागरिकांपर्यंत पोहोचता आले. महसूल दिनाच्या दिवशी या अभियानातील अंतिम शिबिर होत असून, नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला, असे मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी सांगितले.

एप्रिल ते जून या कालावधीत मुंबई शहर जिल्ह्यात सुमारे साडेसात लाख नागरिकांना विविध प्रकारचे दाखले वितरित करण्यात आले.१ ऑगस्ट महसूल दिनानिमित्त मागील वर्षीचा लेखाजोखा सांगतांना, जिल्ह्याला ४९० कोटी रुपयांच्या महसूल वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापेक्षा अधिक म्हणजे ७७९ कोटी रुपयांची महसूल वसुली करण्यात आली असून, निर्धारित उद्दिष्टाच्या १६० टक्के कामगिरी जिल्ह्याने साध्य केली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

गेल्या वर्षभरात महसूल विभागाच्या कामकाजात संगणकीकरणावर विशेष भर देण्यात आला. प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. नागरिकांना कार्यालयांमध्ये वारंवार येण्याची आवश्यकता भासू नये आणि त्यांना आवश्यक सेवा सुलभपणे मिळाव्यात, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी गोयल यांनी सांगितले.

**जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शताब्दीपूर्तीनिमित्त विशेष टपाल आवरणाचे अनावरण**

मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कार्यक्रमात विशेष टपाल आवरणाचे अनावरण करण्यात आले. भारतीय टपाल विभागाच्या माध्यमातून या ऐतिहासिक टप्प्याची नोंद करण्यात आली.

भारतीय टपाल विभागाच्या,जीपीओ निर्देशक रेखा रिजवी यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शताब्दीपूर्तीनिमित्त विशेष आवरण आणि स्मरण टपाल तिकीट तयार करण्यात आले आहे. मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाने गेल्या १०० वर्षांत लोकाभिमुख प्रशासनाची महत्त्वपूर्ण परंपरा जपली आहे. हे विशेष टपाल आवरण पुढील पिढ्यांसाठी, संशोधकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी या ऐतिहासिक वाटचालीची आठवण ठरेल. जिल्हाधिकारी कार्यालयाची यशस्वी वाटचाल पुढेही सुरू राहो, अशी शुभेच्छा त्यांनी दिल्या.

**मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाची १०० वर्षांची गौरवशाली वाटचाल**

मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. शतकभराच्या या वाटचालीत महसूल प्रशासन, नागरिकांना विविध शासकीय सेवा उपलब्ध करून देणे, नैसर्गिक आपत्तीच्या काळात प्रशासनाची भूमिका बजावणे, मालमत्ता व महसूलविषयक कामकाज तसेच शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन!

**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने संघटनेच्या आंबेडकर चौक येथील मध्यवर्ती संपर्क कार्यालयामध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सं. अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या हस्ते लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके, ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे संपर्कप्रमुख आनंद जाधव ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड युनुस शेख ,बबलू मेहत्रे, बंटी बनसोडे, बबलू जोगदंड यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## ८ दिवसानंतर आलेल्या घंटागाडीचे पुष्पहार घालून अनोखे स्वागत; महादेव नगर मध्ये गांधीगिरीने वेधले लक्ष!

### रोज कचरा संकलन करण्याची नागरिकांची मागणी, महादेव नगरात अनोख्या पद्धतीने महापालिकेचा निषेध!

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील वार्ड क्रमांक ३ मधील महादेवनगर आणि गरुड चौक परिसरात तब्बल ८ दिवसांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर आज घंटागाडी दाखल झाली. नेहमी रखडणाऱ्या या सेवेमुळे हैराण झालेल्या नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्ते दीपक गंगणे यांनी घंटागाडीला चक्क पुष्पहार बांधून आणि कर्मचाऱ्यांना गुलाबाचे फुल देऊन गांधीगिरी पद्धतीने अनोखे आंदोलन केले.

लातूर शहरातील पूर्व भागात असलेल्या महादेव नगर व गरुड चौक परिसरात गेल्या ८ दिवसांपासून घंटागाडी आली नव्हती. पावसाळ्यात घरात साचलेला कचरा कुठे टाकायचा? असा गंभीर प्रश्न नागरिकांसमोर निर्माण झाला होता. नाईलाजास्तव काही नागरिकांना खुल्या जागेत व रस्त्याच्या कडेला कचरा टाकावा लागत होता. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून साथीचे आजार व रोगराई पसरण्याची तीव्र भीती व्यक्त केली जात होती. तब्बल आठ दिवसांनंतर आज परिसरात घंटागाडी येताच सामाजिक कार्यकर्ते दीपक गंगणे व स्थानिक नागरिकांनी घंटागाडी चालकाचे स्वागत केले. गाडीला पुष्पहार घालून आणि चालकाला पुष्प देऊन



प्रशासनाचा उपरोधिक निषेध नोंदवण्यात आला.

गेल्या ८ दिवसांपासून परिसरात घंटागाडी न आल्याने कचऱ्याची विल्हेवाट लावणे कठीण झाले होते. कचऱ्यामुळे परिसरात रोगराई पसरण्याची भीती आहे. प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेऊन या भागात रोजच्या रोज नियमित वेळात घंटागाडी पाठवावी. यावेळी नागरिकांनी दररोज नियमितपणे परिसरात घंटागाडी पाठवून कचरा संकलन करण्याची आग्रही मागणी दीपक गंगणे (सामाजिक कार्यकर्ते) यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. या अनोख्या गांधीगिरी आंदोलनाची सध्या संपूर्ण प्रभागात चर्चा रंगली आहे.




## संपादकीय...

### इंडोपॅसिफिकमध्ये भारताचा उदय; चीनच्या आव्हानाला ठोस उत्तर देईल

भारताची 'ॲक्ट इस्ट पॉलिसी' ही केवळ पूर्वेकडील देशांशी संबंध वाढवण्याची रणनीती नसून, इंडोपॅसिफिक प्रदेशात आर्थिक, सामरिक आणि तंत्रज्ञानात्मक भूमिका मजबूत करण्याचा व्यापक प्रयत्न आहे. जपान, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडसोबत वाढणारे सहकार्य या धोरणाला नवी दिशा देत आहे. चीनच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्र्वभूमीवर भारतासाठी ही भागीदारी प्रादेशिक स्थैर्य आणि धोरणात्मक स्वायत्ततेसाठी महत्त्वाची ठरत आहे. भारताची 'ॲक्ट इस्ट पॉलिसी' ही २०१४ मध्ये सुरू झालेली परराष्ट्र धोरणाची महत्त्वाकांक्षी दिशा आहे. पूर्वीची 'लूक इस्ट पॉलिसी' ही मुख्यतः आर्थिक सहकार्यापुरती मर्यादित होती. परंतु 'ॲक्ट इस्ट' ने त्याला धोरणात्मक, सुरक्षा आणि सांस्कृतिक परिमाण दिले. ही बदललेली दिशा भारताच्या व्यापक इंडोपॅसिफिक दृष्टिकोनाशी जोडलेली आहे आणि ऊर्जा आयात, पुरवठा साखळीचे विविधीकरण व प्रादेशिक सांस्कृतिक संबंध यांना नवा आधार देते. त्यामुळे हे धोरण केवळ परराष्ट्र मंत्रालयापुरते मर्यादित नसून व्यापार, संरक्षण आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांचा एकत्रित आराखडा आहे. इंडोपॅसिफिक हा जगातील सर्वात गतिमान आर्थिक प्रदेश आहे. पण त्याचबरोबर चीनच्या वाढत्या प्रभावामुळे तो स्पर्धा आणि तणावाचा केंद्रबिंदू ठरला आहे. भारतासाठी ही दिशा घोषवाक्यापुरती मर्यादित नसून समान विचारांच्या लोकशाही देशांबरोबर सहकार्य आणि धोरणात्मक स्वायत्ततेसाठी अपरिहार्य आहे. जपानच्या पंतप्रधान साने ताकाइची यांच्या भारत भेटीने या धोरणाला ठोस गती दिली. या भेटीत १२ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणुकीची घोषणा झाली आणि संरक्षण तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या क्षेत्रांत शंभरहून अधिक करार झाले. नौदलासाठी अँटेना प्रणालीच्या सहविकासाचा करार हा संरक्षण सहकार्याचा नवा टप्पा आहे. ऊर्जा सुरक्षेसाठी कच्चे तेल साठवणूक, समुद्री वाहतूक आणि १००० बायोगॅस प्रकल्प उभारणीसारखे उपक्रमही ठरले. या सर्व उपक्रमांचा उद्देश चीनकेंद्रित पुरवठा साखळीवरील अवलंबित्व कमी करणे आणि पूर्व व दक्षिण चीन समुद्रातील सुरक्षेला बळकटी देणे हा आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींचा इंडोनेशियातील चालू दौरा संरक्षण आणि खनिज सहकार्यावर केंद्रित आहे. इंडोनेशियाने ब्रह्मोस क्षेपणास्त्र तसेच 'स्ट्रा' एअरटूएअर क्षेपणास्त्र प्रणाली खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. सबांग बंदराचा विकास हा भारतासाठी सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. कारण तो मलक्का सामुद्रधुनीजवळ आहे. निकेल, कॉपर, बॉक्साईट आणि टिन यांसारख्या महत्त्वाच्या खनिजांमध्ये सहकार्य भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी आवश्यक आहे. याशिवाय इंडोनेशियासाठी खास इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि आयआयएम बंगळूरचे कॅम्पस उभारणीसारखे उपक्रम या संबंधांना व्यापक बनवतात. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधील आगामी दौरेही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहेत. क्वाड भागीदार म्हणून ऑस्ट्रेलिया भारताच्या इंडोपॅसिफिक सुरक्षा आराखड्यात मध्यवर्ती आहे. युरेनियम पुरवठा, महत्त्वाची खनिजे आणि सायबर सुरक्षा यावर करार अपेक्षित आहेत. द्विपक्षीय व्यापार आधीच ५४ अब्ज ऑस्ट्रेलियन डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. संरक्षण सहकार्य संयुक्त सराव आणि समुद्री जागरुकतेद्वारे वाढत आहे. न्यूझीलंडला भारतीय पंतप्रधानांचा दौरा हा जवळपास चार दशकांनंतर होत असला तरी द्विपक्षीय संवाद आणि सहकार्य सातत्याने सुरू राहिले आहे. यापूर्वी झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे ९५ टक्के न्यूझीलंड निर्यात शुल्कमुक्त झाली आहे, तर भारतीय वस्तूंनाही सवलती मिळाल्या आहेत. ५००० भारतीय व्यावसायिकांसाठी विशेष व्हिसा आणि विद्यार्थ्यांसाठी नवे मार्ग खुले झाले आहेत. २० अब्ज डॉलर्सची दीर्घकालीन गुंतवणूक ही या संबंधांना आर्थिक बळकटी देते. या सर्व भेटी आणि करारांमुळे 'क्ट इस्ट पॉलिसी'ला नवा आयाम मिळाला आहे. संरक्षण, अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञान यांचा संगम करून भारताने इंडोपॅसिफिकमध्ये आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मात्र, आव्हानेही आहेत. करार केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित राहू नयेत यासाठी ठोस अंमलबजावणी यंत्रणा आवश्यक आहे. देशांतर्गत उत्पादन क्षमता, संशोधन आणि नियामक तयारी वाढवणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. चीनच्या वाढत्या प्रभावाने भारताची धोरणात्मक संयमाची परीक्षा घेतली आहे. बराच काळ भारताने बीजिंगच्या संवेदनशीलतेचा विचार केला; पण त्यातून फारसे लाभ मिळाले नाहीत. आता जपान, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडसोबतची भागीदारी ही चीनच्या दबावाला प्रतिकार करणारी ठोस पावले आहेत. -डए-छ देशांनाही भारताच्या या सक्रिय भूमिकेचा फायदा होतो. कारण त्यांना चीनच्या वर्चस्वाला पर्याय हवा आहे. चीनने दक्षिण चीन समुद्रात केलेल्या कृतींमुळे अनेक देश अस्वस्थ झाले आहेत. भारताचे सहकार्य त्यांना संतुलन देणारे ठरते आणि प्रादेशिक स्थैर्याला नवा आधार मिळतो. भारताने आपली धोरणात्मक स्वायत्तता ठामपणे मांडली पाहिजे आणि संरक्षण, अर्थव्यवस्था व तंत्रज्ञानातील सहकार्य कोणत्याही संकोचाशिवाय वाढवले पाहिजे. 'इंडोपॅसिफिक ओशन्स इनिशिएटिव्ह'सारख्या प्रादेशिक मंचांमध्ये या करारांचा समावेश करून भारताने नेतृत्वाची भूमिका निभावली पाहिजे. हे उचकावणे नाही, तर इंडोपॅसिफिक खुला, सुरक्षित आणि लवचिक ठेवण्याचा प्रयत्न आहे. या घडामोडी महाराष्ट्र आणि भारताच्या पश्र्चिम किनाऱ्यासाठीही महत्त्वाच्या आहेत. मुंबई, जामनगर, रत्नागिरी आणि कोकणातील बंदरे ही इंडोपॅसिफिक व्यापार मार्गांशी थेट जोडली जातात. ऊर्जा आयात, खनिज पुरवठा आणि समुद्री वाहतूक यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था अधिक गतिमान होऊ शकते. तसेच ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधील भारतीय वंशाचे मोठे समुदाय महाराष्ट्राशी सांस्कृतिक व व्यावसायिक नात्यांनी जोडलेले आहेत. त्यामुळे या भागीदारींमुळे केवळ राष्ट्रीय नव्हे तर प्रादेशिक हितसुद्धा साधले जातील. 'क्ट इस्ट पॉलिसी'चा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे ईशान्य भारताला या प्रादेशिक धोरणाशी जोडण्याचा प्रयत्न. म्यानमार, थायलंड आणि आग्नेय आशियाशी भौगोलिक जवळीक असलेल्या ईशान्य राज्यांना व्यापार, पर्यटन आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात. 'क्ट इस्ट' अंतर्गत रस्ते, रेल्वे, जलमार्ग आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी वाढवणे हे भारताच्या प्रादेशिक एकात्मतेसाठी महत्त्वाचे पाऊल आहे. इंडोपॅसिफिक प्रदेशातील देशांमध्ये विश्र्वास निर्माण करण्यासाठी केवळ संरक्षण भागीदारी नव्हे; तर शिक्षण, आरोग्य, नवोन्मेष आणि लोकांमधील संपर्कही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहेत. त्यामुळे 'ॲक्ट इस्ट पॉलिसी' ही भारताच्या आर्थिक विस्ताराबरोबरच दीर्घकालीन सामरिक स्थैर्याचीही आधारशिला बनत आहे. 'ॲक्ट इस्ट पॉलिसी' आता केवळ घोषवाक्य राहिलेले नाही. ती वास्तवात उतरू लागली आहे. जपानचे तंत्रज्ञान व संरक्षण सहकार्य, इंडोनेशियाचे खनिज व समुद्री भागीदारी, ऑस्ट्रेलियाचे ऊर्जा व सुरक्षा संलग्नता आणि न्यूझीलंडचे व्यापार व प्रतिभा गतिशीलता हे सर्व मिळून भारताच्या उदयाला नवे बळ देतात. जर भारताने या करारांची अंमलबजावणी गांभीर्याने केली, तर ही धोरणात्मक दिशा इंडोपॅसिफिकमध्ये भारताच्या उदयाचा पाया ठरेल. ती चीनच्या आव्हानाला ठोस उत्तर देईल, प्रादेशिक स्थैर्याची हमी देईल आणि आर्थिक लवचिकतेचा मार्ग दाखवेल.

# अण्णाभाऊंचे साहित्य म्हणजे कष्टकरी व वंचिताचा आवाज : माजी मंत्री आ.बनसोडे

**उदगीर/प्रतिनिधी :** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे केवळ साहित्य नसून कष्टकरी, श्रमिक, दलित आणि वंचित समाजाच्या वेदना, संघर्ष व स्वाभिमानाला शब्दबद्ध करणारा बुलंद आवाज आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे, असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी केले.

उदगीर येथील साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने ध्वजारोहण कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी नगराध्यक्षा सौ.स्वाती हुडे, उपनगराध्यक्षा सौ.शितल शिंदे, बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार, जि.प.चे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, जि.प.सदस्य डॉ.दिपक सोमवंशी, गटनेते दिलीप मटके, तहसिलदार राम बोरगावकर, मुख्याधिकारी दिपक मोरे, बन्शिलाल कांबळे, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, प्रा.रामकिशन सोनकांबळे, नगरसेवक अनिल मुदाळे, मनोज पुदाले, अमोल अनकल्ले, बाळासाहेब मरलापल्ले, राजकुमार भालेराव, राजकुमार हुडगे, जवाहरलाल कांबळे, धिरज कसबे, अमर सुर्यवंशी, वर्षा कांबळे, शिवकुमार कांबळे, बाळासाहेब पाटोदे, अशोक पुदाले, गणेश गायकवाड, राजकुमार लिंबाळे, विरेंद्र अंबरखाने, ओम गांजुरे, कल्याण कपाळे, मुकरम जहागिरदार, व्यंकट बोईनवाड, इमरोज हाशमी, इब्राहिम नाना, जफर सय्यद, राजकुमार चव्हाण, नवनाथ गायकवाड, अरविंद गिलचे, संघशक्ती बलांडे, मधुमती कनशेट्टे, उर्मिला वाघमारे, रविंद्र बेंद्रे, बालाजी रणदिवे, प्रेम जवळगेकर, देवीलाल कांबळे, महादेव शेल्हाळकर, राजु सुर्यवंशी, राम मोतीराम, नागेश गुंडीले, अंबादास कांबळे, गौतम किंवडे, आनंद बोडके, ऋषी लांडगे, दुर्गाप्रसाद गोटमुकले, अमोल सुर्यवंशी, राम कांबळे, सलिम शेख, आदी उपस्थित होते.

आ.संजय बनसोडे पुढे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून समाजातील अन्याय, विषमता आणि शोषणाविरोधात प्रभावी आवाज उठवला. त्यांनी लोकशाही, समता आणि सामाजिक न्यायाची मूल्ये आपल्या साहित्याद्वारे जनमानसात रुजवली. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे आणि लोककलेतून सामान्य माणसाच्या जीवनसंघर्षाला स्वतंत्र्य मिळाले. त्यामुळे त्यांचे साहित्य आजही तितकेच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव सरकारने भारतरत्न हा सर्वोच्च किताब देवुन करावा अशी मागणी मी मागील काळात सरकारकडे केली असुन त्यासाठी माझा पाठपुरावा चालु असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

आपल्या पुढच्या पिढीला प्रेरणा मिळावी म्हणून उदगीर शहरात अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने १५ कोटीचे भव्य स्मारक आणि अण्णाभाऊ साठे यांचा १५ फुटी पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी १ कोटी २५ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. येत्या एक वर्षात सदर काम पुर्ण होईल असे सांगितले.

समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बन्सिलाल कांबळे यांनी केले. सुत्रसंचालन किरण सुर्यवंशी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रथमेश देवनाळे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यप्रेमी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंना भारतरत्न द्या



# लातूर मनपाचा स्तुत्य उपक्रम! मा. आयुक्तांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांची तपासली पायाभूत साक्षरता

## पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानावर विशेष भर; मा. आयुक्त राहुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. विद्यार्थ्यांची पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (Foundational Literacy and Numeracy - FLN ) तपासण्यासाठी शुक्रवार, दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी सर्व मनपा शाळांमध्ये वेध गुणवत्ता पूर्व चाचणीचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

लातूर शहर महानगरपालिकेचे मा. आयुक्त श्री. राहुल कुलकर्णी यांच्या विशेष संकल्पनेतून आणि मा. उपायुक्त श्रीम. वसुधा फड मॅडम यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या अत्यंत महत्त्वाच्या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली.

FLN चाचणीचा उद्देश आणि महत्त्व:

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ( NEP 2020) आणि निपुण भारत अभियानांतर्गत प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा पाया भक्कम करण्यावर शासनाचा भर आहे. याच अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या या चाचणीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे:

अर्थपूर्ण वाचन आणि गणितीय ज्ञान: विद्यार्थ्यांना केवळ मुळाक्षरे ओळखता येऊ नयेत, तर त्यांनी मजकूर अर्थ समजून घेऊन वाचावा आणि मूलभूत गणितीय क्रियांचा (बेरीज, वजाबाकी इ.) दैनंदिन जीवनात वापर करता यावा, हा यामागील मुख्य उद्देश आहे.

पायाभूत विकास: इयत्ता तिसरीपर्यंतच्या प्रत्येक विद्यार्थ्याने वाचन आणि गणितातील



मूलभूत कौशल्ये १००% प्राप्त करावीत, यासाठी विद्यार्थ्यांची सद्यस्थिती तपासणे या चाचणीतून शक्य होणार आहे.

भविष्यातील गळती रोखणे: विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा पाया भक्कम झाल्यास त्यांना पुढील वर्गातील अभ्यास सोपा जातो, ज्यामुळे शाळेतील गळतीचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होते.

पुढील दिशा:

या पूर्व चाचणीच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्याची अचूक शैक्षणिक पातळी निश्चित केली जाणार आहे. या प्राप्त अहवालानुसार, ज्या विद्यार्थ्यांना अधिक मार्गदर्शनाची आवश्यकता आहे, त्यांच्यासाठी मनपा शाळांमध्ये विशेष उपचारात्मक अध्यापन ((Remedial Teaching) राबविण्यात येणार आहे.

शिक्षण विभागाच्या नियोजनानुसार, सर्व मनपा शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि नियुक्त पर्यवेक्षकांच्या सहकार्याने ही परीक्षा अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक वातावरणात पार पडली. मा. आयुक्त आणि मा. उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या गुणवत्तापूर्ण व विद्यार्थी केंद्रित उपक्रमाचे शिक्षण क्षेत्रातून आणि पालक वर्गातून मोठ्या प्रमाणावर स्वागत व कौतुक केले जात आहे.

## शास्त्री मोहल्ला येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहात साजरी

**जालना/प्रतिनिधी :** शास्त्री मोहल्ला, जुना जालना येथील मातंग समाज सामाजिक सभागृहामध्ये साहित्यारत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त उपस्थित समाजबांधवांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी समाजातील युवकांनी व्यसनमुक्त राहण्याचा निर्धार केला. तसेच मातंग समाज शिक्षणाच्या क्षेत्रात अधिक प्रगती करावा यासाठी प्रत्येक पालकाने आपल्या मुलामुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमास मातंग समाज सामाजिक संघाचे अध्यक्ष राजाराम गायकवाड, सचिव रामदास मोहनदास धाकतोडे, राजेंद्र लांडगे, संतोष सोनवने, अनिल धाकतोडे, राजू धाकतोडे, संतोष कांबळे, अमित गायकवाड, कुंडलिकराव साळवे, विजय कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, अनिल लांडगे, गणेश सोनवने, ज्ञानेश्वर कांबळे, विशाल कांबळे, प्रभाकर कांबळे तसेच इतर समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजातील शिक्षण, सामाजिक एकता आणि व्यसनमुक्ती यासाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# माफ करा बाबासाहेब...








( One Man, One Vote ) वन मॅन वन वोट या तत्त्वाचे खरे महत्त्व आम्ही यापूर्वी पूर्णपणे समजू शकलो नाही. गेल्या ७६ वर्षांत जी चूक झाली, ती यापुढे पुन्हा करणार नाही, असा आम्ही दृढ संकल्प करतो.

आपण दिलेल्या संविधानात्मक लोकशाहीचे जतन, लोकशाही अधिक बळकट करणे आणि बाबासाहेबांचे "शासनकर्ती जमात बना" हे स्वप्न साकार करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते आदरणीय ॲड. बाळासाहेब आंबेडकर दिवस-रात्र कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपद व १२ सदस्यीय कार्यकारिणी निवडणूक २०२६ ही पक्षांतर्गत लोकशाही अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने संपूर्ण महाराष्ट्रात पार पडली.

दिनांक ३० जुलै २०२६ रोजी ठाणे - नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने कोळी समाज हॉल, ठाणे येथील मतदान केंद्रावर आम्ही सर्व स्वाभिमानी कार्यकर्त्यांनी उत्साहाने मतदान करून भारतीय संविधानाने दिलेल्या मतदानाच्या अधिकाराचा उपयोग आपल्या पक्षातील नेतृत्व निवडण्यासाठीही तितक्याच जबाबदारीने करता येतो, हे कृतीतून दाखवून दिले. याच लोकशाही मूल्यांना पुढे नेत, २०२९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्येही "एक पक्ष- एक नेता" या भूमिकेसह आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून, वंचित - बहुजनांचा बुलंद आवाज ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांना दिल्लीच्या संसद भवनात तर महाराष्ट्राच्या विधान भवनात सुजात (दादा) आंबेडकर यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्धार आपण सर्वांनी केला पाहिजे.

"भिमराया तुझ्या घराण्याला कधी बेईमान होणार नाही..!तुझ्या नातवांच्या पक्षाला सोडून दुसऱ्या पक्षात जाणार नाही..!!वंचित बहुजन आघाडी हा असा पक्ष आहे की, येथे नेतृत्व निवडण्याचा अधिकार कोणत्याही एका व्यक्तीकडे नसून प्रत्येक कार्यकर्त्याकडे आहे. हाच आपल्या पक्षाचा इतर पक्षांपेक्षा वेगळेपणा आणि लोकशाहीवरील विश्वास आहे. "आम्ही भारताचे लोक..." या संविधानाच्या उद्घोषणेतील मूल्ये अधिक सक्षम करण्यासाठी आणि या देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी आपण सर्वांनी सातत्याने प्रयत्नशील राहू या.

नुकतेच ठाणे - नवी मुंबई येथील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने मतदान केंद्रावर उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावला. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार आणि हार्दिक अभिनंदन. जय भीम ! जय संविधान !!

कल्याणराव एच. हनवते

( मा. उपाध्यक्ष, बेलापूर विधानसभा)

नवी मुंबई ९९६७७१६४४३

# देवाच्या दारातच अवैध दारुचा मोठा व्यवसाय! ऊत्तरेश्वर पिंपरी येथील घटना!

## ➤ केज पोलिसांची अवैध दारू साठ्यावर मोठी कारवाई!
## ➤ ७४ हजार ७२० रुपयांच्या मुद्देमालसह आरोपीला घेतले ताब्यात

**केज/प्रतिनिधी :** विसाव्या शतकातील महान संत विभुती ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महारज यांचे वास्तव्य असणाऱ्या आणि त्यांच्या विषयी श्रद्धा असणारे अनेक भाविक गण महाराष्ट्रातुन केज तालुक्यातील उत्तरेश्वर पिंप्री येथे मोठ्या श्रद्धेने येतात. माऊली महाराज यांनी ह्यात असताना उत्तरेश्वर पिंपरी व परिसरात अनेक व्यसनाधीन झालेले व्यसनी यांना व्यसनापासून मुक्त केले होते.

या परिसरात कोणतेही अवैध धंदे चालत नसायचे मात्र आज त्यांच्याच पाठी महाराष्ट्रभर ख्याती असलेले उत्तरेश्वर पिंपरी या श्रद्धास्थानी अवैद्य धंद्यांनी उच्छाद मांडला असून अगदी मंदिराच्या समोरच देवाच्या दारातच भर रस्त्यावर अवैध दारू विक्रीचा मोठा व्यवसाय सुरू असल्याने याची माहिती केज पोलिसांना लागल्याने त्यांनी या ठिकाणी काल मोठी कारवाई करत अवैद्य दारूचा मोठा साठा जप्त केला आहे.

काल शनिवार रोजी ड्रायडे असल्याने



केज पोलिसांनी अवैध दारू साठ्यावर मोठी कारवाई करून ७४ हजार ७२० रुपयांच्या मुद्देमालासह आरोपीला ताब्यात घेतले आहे. यापुढे केज शहरासह तालुक्यातील अवैध धंदे करणाऱ्याची गय केली जाणार नाही. अवैध धंद्याच्या संबंधांनी नागरिकांना काही माहिती मिळाली तर त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. असे आवाहन केज पोलीस ठाण्याचे नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी केज पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना पोलीस सहाय्यक निरीक्षक लक्ष्मण उंबरे यांना गोपनीय माहिती मिळाली की, इसमनामे प्रकाश शिवाजीराव बिडकर रा.उत्तरेश्वर पिंपरी ता. केज हा उत्तरेश्वर पिंपरी येथील मंदिराच्या समोरील विजय हॉटेलच्या बाजूला विनापरवाना देशी, विदेशी दारूची चोरटी विक्री करीत आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे यांना मिळालेली माहितीनुसार त्यांनी पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांना सदर बातमीची माहिती दिली.

पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली व आदेशानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक अमेर इनामदार, पोहे/बाळासाहेब अहंकारे, पोअं/नितीन वारे,पोअं/दादाराव देवगुडे यांनी उत्तरेश्वर पिंपरी येथील विजय हॉटेलच्या बाजूला आडोशाला विक्री करीत असलेल्या इसमावर अचानक सदरील ठिकाणी ३-०५ वाजण्याच्या सुमारास छापा मारला.

प्रकाश शिवाजी बिडकर हा इसम चालवत असलेल्या हॉटेल विजयच्या मागच्या बाजूला असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये जाऊन पोलीस पथकाने पहाणी केली असता सदरील ठिकाणी ब्ल्यू व्हिस्की कंपनीच्या-९५ बाटल्या, रॉयल स्टॅग व्हिस्की कंपनीच्या-२४ बाटल्या, मेक डॉल नं.१ व्हिस्की कंपनीच्या-३७ बाटल्या, किंग फिशर बियर कंपनीचे-५ बॉक्स, टुबर बियर कंपनीचे-२ बॉक्स, देशी दारू टँगो पंच कंपनीच्या-२१० बाटल्या, देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या-६५ बाटल्या असा एकूण ७४ हजार ७२० रुपयांचा मुद्यमाल माल मिळून आला.

आरोपी नामे प्रकाश शिवाजी बिडकर वय ७५ वर्षे रा. उत्तरेश्वर पिंपरी ता. केज याच्या विरुद्ध केज पोलीस ठाणे येथे गु.र.नं.४८८/२०२६ कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोना/पुरुषोत्तम शेप हे करीत आहेत. सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम, सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक अमेर इनामदार, पोहे/बाळासाहेब अहंकारे, पोअं/नितीन वारे, पोअं/दादाराव देवगुडे,पोअं/संतोष गीते,पोअं/शिवाजी कागदे यांनी केली आहे.

## शिर्डीत गुरुभक्तीचा महापूर! ३ दिवसांत साईबाबांच्या चरणी ७.८१ कोटींची देणगी, मागील वर्षाचा विक्रम मोडला

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या श्री गुरुपौर्णिमा उत्सवाला यंदाही देश-विदेशातील साईभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. साईबाबांना आपले सद्गुरू मानणाऱ्या लाखो भाविकांनी साईचरणी नतमस्तक होत गुरुदक्षिणा म्हणून भरभरून दान अर्पण केलं. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या अवघ्या तीन दिवसांत संस्थानला ७ कोटी ८१ लाख १३ हजार रुपयांची देणगी प्राप्त झाली. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा सुमारे दीड कोटी रुपयांनी वाढ झाली असून, गेल्या वर्षीचा विक्रम मोडला असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

साईबाबा संस्थानच्या वतीनं यदांच्या वर्षी २८ जुलै २०२६ ते शुक्रवार ३० जुलै २०२६ या तीन दिवसांच्या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या गुरुपौर्णिमा उत्सवात सुमारे तीन लाखांहून अधिक साईभक्तांनी साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं. या दरम्यान भाविकांनी दक्षिणा पेटीत रोख स्वरूपात २ कोटी ४ लाख ३५ हजार ५५७ रुपये अर्पण केले. देणगी काऊंटरवर १ कोटी २५ लाख ४७ हजार ९३५ रुपये तसेच पीआरओ कार्यालयामार्फत ८७ लाख १४ हजार रुपये, तर डेबिट-क्रेडिट कार्ड, ऑनलाइन देणगी, धनादेश चेक, डीडी आणि मनी ऑर्डरद्वारे एकूण २ कोटी ७ लाख ८४ हजार ७०१ रुपये संस्थानला प्राप्त झाले. याशिवाय परकीय चलनाद्वारे ५ लाख ६५ हजार ९९१ रुपयांची देणगी मिळाली. याचबरोबर भाविकांनी रोख रकमेबरोबरच सुवर्ण आणि रौप्य दागिनेही मोठ्या प्रमाणात अर्पण केले.

या कालावधीत १,१२५.५७० ग्रॅम सोने प्राप्त झाले असून त्याचे मूल्य १ कोटी ४६ लाख ७४ हजार ५४४ रुपये इतके आहे. तसेच २,३७६.५०० ग्रॅम चांदी प्राप्त झाली असून तिचे मूल्य ३ लाख ९० हजार ६४९ रुपये इतके प्राप्त झाले असल्याची माहिती, गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

गुरुपौर्णिमा उत्सवाच्या तीन दिवसांत श्री साईबाबा प्रसादालयामध्ये १ लाख ९४ हजार २८५ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा लाभ घेतला. तसेच ३९ हजार ६११ अन्नप्रसाद पाकिटांचे वितरण करण्यात आले. साई दर्शन रांगेतील १ लाख ६५ हजार २०० साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकिटांचे वाटप करण्यात आले. याशिवाय सशुल्क प्रसादरूपी लाडू पाकिटांच्या विक्रीतून संस्थानला ७१ लाख ७ हजार ३६० रुपयांचे उत्पन्न प्राप्त झालं.

तीन लाख भाविकांनी घेतलं साईसमाधीच दर्शन : मागील वर्षीच्या गुरूपार्णिमा उत्सवात साईभक्तांनी साईबाबांना बाबांना गुरू मानत साईचरणी गुरुपोर्णिमा उत्सवात तीन लाख भाविकांनी साई समाधीचं दर्शन घेतलं. तसेच या उत्सव काळात तीन दिवसात ६ कोटी ३१ लाख ३१ हजार रुपयांची देणगी प्राप्त झाली. तर या यंदाच्या गुरुपौर्णिमा उत्सवाच्या तीन दिवसात भाविकांनी तब्बल ७ कोटी ८१ लाख १३ हजार रुपयांची देणगी साईबाबांच्या चरणी अर्पण केली. यंदा मागील वर्षाचा विक्रम मोडला असून तब्बल दीड कोटींनी वाढ झाली असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

# अभिजीत दिपके यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे विश्वास आरोटे यांच्याकडून सदिच्छा भेट

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखा, छत्रपती संभाजीनगर (मराठवाडा विभाग) यांच्या पदाधिकाऱ्यांनी आज सीजेपीचे अभिजीत दिपके यांच्या निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेत आगामी पुरस्कार सोहळ्याचे निमंत्रणपत्र प्रदान केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत, ज्येष्ठ पत्रकार मधुकर वैद्य, जिल्हाध्यक्ष छबुराव ताके आणि जिल्हा सरचिटणीस सुजित ताजने यांनी भेट घेतली.

या प्रसंगी विश्वास आरोटे यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची वाटचाल, उद्दिष्टे तसेच पत्रकारांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. पत्रकारांच्या संघटनात्मक बळकटीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यानंतर अभिजीत दिपके यांचा पुष्पगुच्छ व श्री साईबाबांची मूर्ती देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. तसेच आगामी पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले. यावेळी पत्रकारिता, सामाजिक बांधिलकी आणि संघटनात्मक विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.



## बनसारोळा येथे साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील बनसारोळा येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि बहुजन समाजाच्या प्रबोधनासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाचा गौरव केला. त्यांच्या साहित्याने व विचारांनी समाजात समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची प्रेरणा दिली असून आजही त्यांचे कार्य नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे यावेळी वक्त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जतन करून समाजप्रबोधनासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी उपस्थित राजेंद्र कावळे किसन वाघमारे नंदकिशोर कावळे अनिल जोगदंड बिभिषन पौळ आशोक धायगुडे सुधीर रानमारे तुकाराम पाचाळ यांच्यासह नागरिक, वाचक व सभासद, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनोरुग्ण संजय राऊत, उद्धव ठाकरेंना मानसोपचाराची गरज
## भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांची घणाघाती टीका

**मुंबई/प्रतिनिधी :** संजय राऊत, तुम्हाला आणि तुमचे मालक उद्धव ठाकरेंना यांना अभिजीत दिपकेमध्ये विष्णूचा अवतार दिसतो, याला मानसिक रुग्णावस्था म्हणतात. तुम्हाला मानसिक उपचाराची गरज आहे आणि तुमचा उपचार महाराष्ट्रात होणार नसल्याने आम्ही वर्गणी काढून सिंगापूरच्या रुग्णालयात तुमच्यावर मानसिक उपचार करू. अभिजीत दिपकेची विष्णूच्या अवताराबरोबर तुलना करता आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीजींवर टीका करता यावरूनच तुमच्या गोळ्या संपलेल्या आहेत, हे महाराष्ट्राच्या लक्षात आले आहे, असा प्रहार भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शनिवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

महाराष्ट्रातल्या जनतेने पळवून लावल्याने तुमची पळता भुई थोडी झाली आहे. अमितभाई शाह या देशाचे गृहमंत्री आहेत आणि त्यांनी कलम ३७० हटवले. पळून जाणाऱ्यांमधले अमितभाई नाहीत, तर संजय राऊत आणि उद्धव ठाकरे हे दोघे पळपुटे आहेत. तुम्हाला वंदे मातरम् सक्तीचे विधेयक चालत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमितभाई शाह यांनी त्याबाबत संसदेत कायदा पारित केला आणि आता तुमच्यासारख्या देशद्रोह्यांच्या बुडाला आग लागल्यानेच तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमितभाई यांच्यावर टीका करता, असे श्री. बन यांनी सुनावले.मुळात संजय राऊत हे उबाठा गटाची जमीन भुसभुशीत करणारे गांडूळ आहेत, असे सांगून श्री. बन म्हणाले, गांडुळासारखा दुतोंडीपणा तुम्ही करता हे महाराष्ट्राने पाहिले आहे. जयकुमार गोरे यांच्यावर टीका करू नका. ते काय आहेत, हे महाराष्ट्राला माहिती आहे. त्यांना चार वेळा जनतेने निवडून दिले आहे आणि तुम्हाला अजून भांडुपचा नगरसेवकही निवडून आणता आला नाही. गृहमंत्रालयाचा लिलाव करण्याची कुवत आणि वकूब तुमच्यात नाही. तुमच्या उबाठा गटाचाच लिलाव झाला आहे. स्वत:च्या खासदारकीचा आणि हिंदुत्वाचा लिलाव करून तुम्ही तुमचा पक्ष काँग्रेसच्या दावणीला बांधला आहे. आता या देशाचा लिलाव करण्याचे स्वप्न तुम्ही पाहत आहात. परंतु या देशातील तरुणाई आणि देशातील नागरिक पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या पाठीशी आहेत. तुमचे हे स्वप्न कधीही पूर्ण होणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी मोठ्या मनाने या तरुणांशी संवाद साधत सांगितले की, एखादा तरुण चुकला तर त्याला सोबत घेतले पाहिजे. आपल्याला देश पुढे न्यायचा आहे, भारताचे भविष्य घडवायचे आहे. सगळ्यांना सोबत येऊन देशासाठी काम करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि या तरुणांचे नाते आजोबा आणि नातवाचे आहे. संजय राऊत मात्र कंसमामा प्रमाणे वागत आहेत. जेन झीशी तुम्हाला काही काहीही देणे-घेणे नाही. तुम्हाला फक्त तुमची राजकीय पोळी भाजायची आहे.

स्वत:ची खासदारकी आणि भावाची आमदारकी टिकवायची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी या तरुणांसोबत आहेत. याच तरुणांच्या आशीर्वादाने २०१४ ला नरेंद्र मोदीजी पंतप्रधान झाले, २०१९ आणि २०२४ ला पुन्हा सत्तेत आले आणि याच तरुणांच्या पाठिंब्यामुळे २०२९ मध्येही पंतप्रधान नरेंद्र मोदीजी चौथ्यांदा पंतप्रधान म्हणून शपथ घेतील. मतांच्या माध्यमातून तुमच्या पक्षाचा वध करण्याचे काम महाराष्ट्रातल्या जनतेने याआधी केले आहे आणि २०२९ मध्येही तुम्हाला घरी बसवले जाईल, अशा शब्दात श्री. बन यांनी खरडपट्टी काढली.

# केज शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

**केज/प्रतिनिधी :** केज शहरातील विविध भागातील अनेक ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या१०६ व्या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक उपक्रम घेऊन मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. शहरातील सिद्धार्थ नगर क्रांतीनगर यासह इतर ठिकाणचे ध्वजारोहण हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या हस्ते संपन्न झाले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त केज शहरासह तालुक्यातील अनेक ठिकाणी विविध उपक्रम घेऊन जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली आहे. शहरातील क्रांतीनगर व सिद्धार्थ नगर येथील





कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड तर गटनेते भाऊसाहेब गुंड, शेकापचे भाई मोहन गुंड, नगरसेवक अझरभाई इनामदार, युवा उद्योजक शकील सय्यद, शिवसेनेचे बालासाहेब पवार, राष्ट्रवादीच्या शितल लांडगे, पत्रकार तात्या गवळी, युवा नेते लखन हजारे, युवा उद्योजक विजय लांडगे, संभाजी शिनगारे सर, गोविंद लांडगे, वंचितचे प्रवीण मस्के, अक्षय हजारे, शिवसेनेचे रोहित कसबे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करून महामानवांच्या प्रतिमेचे धूपदीपाने पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जयंती उत्सव समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल,श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत उपस्थित त्यांना मोलाचे मार्गदर्शन करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. शहरातील जयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष सचिव, पदाधिकारी यांनी विविध सांस्कृतिक उपक्रम घेऊन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी केली. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, सचिव यांच्यासह जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, महिला, नागरिक, युवक,युती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात पाणी टंचाई उपाय योजनांना ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात अपुऱ्या पर्जन्यमानामुळे निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईमध्ये आवश्यकतेनुसार खाजगी विहीर किंवा विंधन विहीर अधिग्रहाच्या कालावधीस ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत किंवा पुरेसा पाऊस होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी निर्गमित केले आहेत. सद्यस्थितीत जिल्ह्यात १२३ गावे आणि ३७ वाड्यांमध्ये २०४ विहिरी तथा विंधन विहिरींचे अधिग्रहण करून पाणी पुरवठा सुरू आहे.

या आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी आणि मुख्याधिकारी यांनी प्रत्यक्ष पाणी टंचाई निर्माण झालेल्या गावे व वाड्यांमध्ये स्थानिक परिस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाच्या नियमांनुसार नागरी व ग्रामीण भागाकरिता खाजगी विहीर किंवा विंधन विहीर अधिग्रहणास मान्यता देण्याचे अधिकार जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना त्यांच्या कार्यक्षेत्रापुरते प्रदान करण्यात आले आहेत. स्थानिक प्रशासनाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून आवश्यकतेनुसार उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

# समाधान शिबिराच्या माध्यमातून सर्व योजना एकाच छताखाली उपलब्ध : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**लातूर/प्रतिनिधी :** समाधान शिबिराच्या माध्यमातून सर्व योजना एका छताखाली उपलब्ध होत असून यामुळे सर्वसामान्य जनतेचे वेळेची बचत व आर्थिक बचत असल्याचे राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. अहमदपूर येथे संत सावतामाळी मंगल कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त व माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे होत्या.

लातूर जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, लातूर जिल्हा परिषद सभापती उत्तम माने, अहमदपूरच्या तहसीलदार उज्वला पांगारकर, चाकूरचे तहसिलदार नरसिंग जाधव, जिल्हा परिषद सदस्य त्र्यंबक गुट्टे, अहमदपूर पंचायत समिती सभापती सुरज पाटील, अहमदपूरच्या उपसभापती अयोध्या केंद्रे, चाकूरचे उपसभापती चाकूर भुजंगराव शिंदे, जिल्हा परिषद सदस्य प्रफुल्लचंद्र गुंडरे, प्रतीक्षा गुट्टे, अश्विन नागराळे, रंजना चाटे, उषाताई सोनकांबळे, भानुदास पोटे, अहमदपूरचे उपनगराध्यक्ष अय्याज शेख, प्रदीप खोमणे, नगरपंचायत चाकूर नगराध्यक्ष भागवत फुले, भागवत गुट्टे, पंचायत समिती सदस्य सुधीर गुट्टे, रविंद्र बोडके, गजानन होनराव, संतोष कलवले, तानाजी राजे, मधुकर मुंढे आदी उपस्थित होते.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, या समाधान शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला शासकीय योजनांचा माहिती व लाभ सुलभ पद्धतीने मिळत आहे. शासन व प्रशासनाच्या माध्यमातून अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जात असून शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली आहे. आगामी काळातही विविध लोकाभिमुख योजना राबवून सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सहकार मंत्री श्री. पाटील म्हणाले.

राज्य शासनाने आतापर्यंतची सर्वात मोठी शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलास मिळाला आहे. कर्जमुक्तीच्या यादीत नाव आलेल्या शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण करून घ्यावे. आधार प्रमाणीकरणाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार असल्याचे सहकार मंत्री श्री. पाटील यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांनी केले. यामध्ये त्यांनी महसूल विभागामार्फत देण्यात येत असलेल्या सेवांची माहिती दिली. तसेच सध्या सुरु असलेल्या एसआयआर मोहिमेत सहभागी होऊन सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात महसूल विभागासह विविध विभागातील लाभार्थ्यांना लाभाचे वाटप सहकार मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी दिलीप देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तलाठी अविनाश पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महसूल विभागासह अन्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला. यावेळी विविध स्टॉल उभारण्यात आले होते. या सर्व स्टॉलची पाहणी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व इतर सर्व अधिकाऱ्यांनी केली. या समाधान शिबिरास अहमदपूर व चाकूर तालुक्यातील मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती होती.

# रवींद्र कानगावकर यांची जिल्हा व सत्र न्यायालयात प्रबंधक पदी नियुक्ती





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा व सत्र न्यायालयातील प्रशासकीय विभागात कार्यरत असलेले सन्माननीय श्री.रवींद्र कानगावकर यांची नुकतीच जिल्हा प्रबंधकपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग लातूरच्या विधिज्ञ सदस्यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यास मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या. या समयी त्यांना पुढे कार्यरत राहण्याची सम्यक प्रेरणा मिळावी म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगच्या विधिज्ञ सदस्यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदेत भारताचे संविधान भारताला सुपूर्द करताना जो इशारा दिला होता.त्या भाषणाची प्रत सन्मान म्हणून भेट दिली.

याचा सन्माननीय श्री.रवींद्र कानगावकर यांनी अतिशय प्रसन्न मनाने स्वीकार केला असून त्यांच्या कार्यालयामध्ये उपस्थित असलेल्या सर्व कर्मचारी वर्गाने या क्षणी आनंद व्यक्त केला आहे. यावेळी ॲड. शिवकुमार बनसोडे, ॲड. राजेंद्र लातूरकर,ॲड. सचिन कांबळे,ॲड. प्रशांत गायकवाड, ॲड.अक्षय बनसोडे व आदी उपस्थित होते.

## फुटबॉल स्पर्धेत वाले इंग्लिश स्कूल संघाचा मूले आणि मुली यांचा उपविजेता





**लातूर/प्रतिनिधी :** येथील वर्ल्ड फीस स्कुल या मैदानावर घेण्यात आलेल्या सुब्रतो मुखर्जी जिल्हास्तरीय फुटबॉल चषक स्पर्धेत वाले इंग्लिश स्कूलचा उपविजेता ठरला आहे. या जिल्हास्तरीय स्पर्धेत वाले इंग्लिश स्कूल १७ वर्षाखालील मूल आणि मुलीनी अंतिम सामन्यापर्यंत जाऊन उपविजेता मिळवला. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य श्री. भोगडे सर, उपप्राचार्य श्री. बाकलीकर सर, पर्यवेक्षिका श्रीमती भारती मॅडम. श्री. गणेश गिराम सर व सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले.

# विश्वाला युद्धाची नसून बुध्दाची गरज आहे : भिक्खू पय्यानंद थेरो

### भिक्खू पय्यानंद थेरो यांनी आषाढ ते अश्विन पौर्णिमा (तीन महिने) आपल्या चौदाव्या वर्षावास अधीष्ठानास प्रारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** तथागत बुध्द २५०० वर्षांपूर्वी होऊन गेले आहेत. परंतु बुध्दाचा विचार हा आजही आणि येणाऱ्या काळातही उपयुक्त आहे. त्यांनी समता, करुणा, प्रेम, शांती, नीतिमत्ता आणि मैत्री अशा विश्वव्यापी मानवतेचा संदेश दिला आहे. आज जगाला युद्धाची नाही तर बुद्धाच्या शांती व मैत्रीची गरज असल्याचे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले आहे. बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित आषाढ पौर्णिमेच्या निमित्त धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन महाविहार सातकर्णी नगर, रामेगाव ता.जि.लातूर येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून त्रिशरण पंचशील बुध्द वंदनेने करण्यात आली. जगात भाषावाद, प्रांतवाद, विषमतावाद, वर्चस्व वाद, आर्थिक आणीबाणी, गट-तट, भेदा-भेद इत्यादी गोष्टीचे भीषण संकट उभे राहत आहे. यामुळे देशा-देशात, गटा-गटात सामाजिक असहिष्णूता वाढत आहे. त्यामुळं युद्धजन्य परिस्थिती निर्माण होत आहे. परंतु बुध्दाची शांती आणि मैत्री ही त्यावर एकमात्र उपाय आहे.

बुध्दाने सारनाथ येथे आपल्या प्रवचनात चार आर्य सत्य आणि अष्टांगिक मार्गाचे मार्गदर्शन करताना मानवी दुःख हे आंतरिक आणि भौतिक नष्ट करण्यासाठी केले होते असे आपल्या धम्म देसनेत भंतेजी म्हणाले. यावेळी बौध्द लेणी, खरोसा येथील भिक्खू सुमेध नागसेन, भंते बोधीराज यांची धम्मदेशना संपन्न झाली.



यावेळी प्रमुख पाहुणे समाजकल्याण विभागीय आयुक्त अविनाश देवसटवार म्हणाले की, बुध्दाचा धम्म आणि विप्पसना ही बुद्धाने जगाला दिलेली अनमोल देणगी आहे. बुध्दाचे विचार हे मानवतेचे विचार आहेत. त्याचे सर्वांनी आपल्या व्यक्तिगत जीवनात पालन करावे असे सांगून सर्वाना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी शिल्पा राजु आर्वीकर, अनिता तेलगावकर, आकांशा थोटे, मुकुंद हालसे आदींनी पूज्य भिक्खू संघास चिवर आणि अष्ठपरिष्कार दान दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा.देवदत्त सावंत यांनी केले तर आभार पांडुरंग अंबुलगेकर यांनी मानले. यावेळी डॉ.संजय गवई, आर. पी.गायकवाड, ए.पी.कांबळे, अशोक कांबळे, कुमार सोनकांबळे, त्रिंबक कवठेकर, सूर्यभान लातूरकर, एम.एच सागर, विक्रम सिरसाट, ज्योतीराम लामतुरे, भुजंग कांबळे, ज्ञानेश्वर सुरवसे, अन्तेश्वर थोटे, जयवंत भुसनीकर, शोभा सोनकांबळे, कल्पना कांबळे, मिना कदम मयुरी आल्टे, कविता कदम, शिला वाघमारे, कविता धावारे, प्रतिभा आदमाने, श्यामल कांबळे, निर्मला थोटे, पंचशीला बनसोडे, कल्पना कांबळे, सुनीता शृंगारे, सुभद्रा महालिंगे शकुंतला नेत्रगांवकर, सुलोचना महालिंगे, रमा शेळके, सुनिता शृंगारे, वैशाली कांबळे यांच्यासह मोठया संख्येने बौध्द उपासक-उपासिका उपस्थित होते. समता महिला मंडळ, हडको कॉलनी यांच्यावतीने सर्वांना भोजन देण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उदय सोनवणे, मिलिंद धावारे, डॉ.अरुण कांबळे, अनिरुध्द बनसोडे, धम्मपाल साकळे, सतिश मस्के, राजेश कदम, गौतम आदमाने, आकाश सरवदे, करण ओव्हाळ, रुपाली सूर्यवंशी, अंजली सोनकांबळे, अनुजा बनसोडे आदींनी परिश्रम घेतले.

## सरस्वती महाविद्यालयात लेखन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.१ ऑगस्ट २०२६ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.पांडुरंग गोरे यांच्या शुभहस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती " लेखन प्रेरणा दिवस म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयात व्याख्याते प्रा.श्रीमंत दोरवे यांचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्त्व या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी बोलताना प्रा. दोरवे म्हणाले की, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे वास्तववादी साहित्य असून त्यातून समाजात जीवनमूल्यांची रुजवणुक होते.अण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या सोबत महाराष्ट्राच्या मुक्तिलढयात दिलेले योगदान अविस्मरणीय आहे. अण्णाभाऊनी सतत लोकजागृती करून महाराष्ट्रवासीयांचा स्वाभीमान जिवंत ठेवला, शाहीर गहाणकर, शाहीर अमर शेख व कॉम्रेड अण्णांभाऊनी जग बदल घालुनी घाव,सांगून गेले मज भीमराव,गुलामगिरीच्या या चिखलात, रुतून बसला का ऐरावत, अंग झाडूनी निघ बाहेरी,घे बिनीवरती घाव, सांगून गेले मज भीमराव अशा गीतांच्या आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजप्रबोधनासाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या विचाराप्रमाणे प्रत्येकांनी आचरण करावे असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

# महापुरुषांचे विचार समाजाला समता, स्वाभिमान आणि परिवर्तनाची दिशा देतात! : डॉ. सूर्यवंशी

### महिला मंडळांच्या पुढाकारातून अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

**अहमदपूर/प्रतिनिधी :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित आणि कष्टकरी जनतेच्या वेदनांना शब्द दिले. समता, स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तनाचा त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचे आचरण करूनच समतामूलक समाजाची निर्मिती शक्य आहे, असे प्रतिपादन सम्राट मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक, युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले.

अहमदपूर शहरातील प्रभाग क्रमांक २ येथे थोर साहित्यिक, लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक कार्यक्रमाचे आयोजन येथील सर्व महिला मंडळांच्या पुढाकारातून उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी हे होते या वेळेस अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते,





तर प्रमुख पाहुण्या म्हणून नवनिर्वाचित नगरसेविका सौ. तनुजा सिद्धार्थकुमार सूर्यवंशी,पत्रकार अजय भालेराव,शहराध्यक्ष बजरंग गायकवाड,मेजर तलवारे आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अण्णाभाऊ साठे यांच्यासह महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर परिसरातील विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रभावी भाषणे करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक आणि परिवर्तनवादी कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. महिलांनी समाजप्रबोधनाच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमास भारतबाई कांबळे,राजाबाई कांबळे, वंदना गायकवाड, विजया गायकवाड अंजलीताई भाले, अंजनाबाई जुबरे, दैवशालाबाई क्षिरसागर, रुक्मीनबाई गायकवाड, माधवी कांबळे, अनिता भोगे, शांताबाई मोरे, वेणुबाई कांबळे, कालींदा गोट मुकले, प्रभाबाई वाघमारे, शितल गायकवाड, संगीता वाघमारे, मोनिका गायकवाड, आरती डोंगरे, सुषमा बानाटे, लताबाई गायकवाड, कमलबाई डोंगरे, चंद्रकलाबाई डोंगरे, पूजा डोंगरे, सविताबाई डोंगरे, कोंडाबाई मसुरे, सीमा सुर्यवंशी, मनीषाबाई गायकवाड, सरस्वती पिलवटे, दैवशाला ढवळे, उषाबाई कांबळे, राणी गायकवाड, गंगासागर कांबळे, राजाबाई सुर्यवंशी आदींसह प्रभागातील महिला मंडळांच्या पदाधिकारी, नागरिक, युवक, विद्यार्थ्यांसह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश वाघमारे यांनी केले.तर आभार प्रदर्शन संतोषभाऊ पिलवटे यांनी मानले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.